# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयात रुग्णांकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(१) १९०१२ (१४-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथे थॅलेसिमिया या आजारासाठी वेगळा कक्ष असून त्याठिकाणी कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी कमी असल्यामुळे तेथील रुग्णांकडे दुर्लक्ष होत आहे याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ जून २०१५ रोजी मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कक्षातील थॅलेसिमिया या रुग्णांना दर दहा ते पंधरा दिवसांनी रक्ताची आवश्यकता असून तेथील रक्तपेढी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना रक्तपुरवठा करण्यास गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने तेथील रुग्णांना पुरेशा प्रमाणात रक्त पुरवठा करण्यासाठी व पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे. तक्रार केली आहे हे खरे आहे. तथापि, कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी कमी असले तरी रुग्णांकडे दुर्लक्ष केले जात नाही.

(२) हे खरे नाही. मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर येथे रक्त घटक निर्मिती केंद्र असून तेथे रुग्णालयीन गरजेप्रमाणे प्रत्येक महिन्यात पुरशा प्रमाणात रक्तसाठा, रक्तपेढीत उपलब्ध ठेवण्यात येत असल्यामुळे रक्तपुरवठा करण्यात रुग्णांची गैरसोय होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये रक्ताचा पुरवठा करताना विंडो पीरीयडमध्ये रक्तातील विषाणू शोधण्यासाठी न्यूक्लिईक ॲसिड टेस्ट (एन.ए.टी) रक्तपेढयांना बंधनकारक करणेबाबत.**

**(२) १९४७३ (१४-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये रक्ताचा पुरवठा करताना विंडो पीरीयडमध्ये रक्तातील विषाणू शोधण्यासाठी न्यूक्लिईक ॲसिड टेस्ट (एन.ए.टी) आवश्यक असताना, ते होत नसल्याचे माहे मार्च २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एन.ए.टी. टेस्ट करणेसाठी जास्त खर्च आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रक्त पुरवठा करणा-या रक्तपेढ्यांना ते बंधनकारक असावे याबाबत शासनाचे काय धोरण आहे,

(४) असल्यास, सदर टेस्ट जास्त खर्चीक असल्याने कमी दरामध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(५) नसल्यास, त्यांची काय कारणे आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

केंद्र शासनाच्या अन्न व औषध प्रसाधने कायदा १९४५ नुसार न्युक्लिक ॲसिड टेस्ट (एन.ए.टी.) ही चाचणी करणे बंधनकारक नाही. अन्न व औषध प्रसाधने कायदा १९४० व १९४५ नुसार राज्यातील सर्व नॅको सहाय्यीत रक्तपेढयांमध्ये सद्य:स्थितीत (HIV, HCV, HBV) या प्रकारच्या रक्तातील विषाणूची तपासणी करण्याकरीता III Generation ELISA Test या चाचणीचा वापर करण्यात येतो.

मात्र न्युक्लिक ॲसिड टेस्ट (एन.ए.टी.) ही चाचणी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर म्हणून अधिकची उच्च तंत्रज्ञानावर आधारीत तपासणी म्हणून करता येऊ शकते.

(२) हे खरे आहे.

सदर एन.ए.टी. करणेसाठी जास्त खर्च आहे. HIV, HCV, HBV या तीनही विषाणू करीता एकत्रित तपासणीसाठी एकुण रु. १००० ते रु. १२०० खर्च अपेक्षित आहे.

(३) केंद्र शासनाच्या अन्न व औषध प्रसाधने कायदा १९४५ नुसार न्युक्लिक ॲसिड टेस्ट (एन.ए.टी.) ही चाचणी बंधनकारक करता येत नाही

(४) राज्यात मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ठिकाणी न्युक्लिक ॲसिड टेस्टींग (NAT) सेंटर उभारण्याचे प्रस्तावित आहे.

सदर तपासणी केंद्रामध्ये नॅको सहाय्यीत व शासकीय रक्तपेढ्यांतील रक्त तपासणीसाठी आणून नंतर पुढे रक्त संक्रमण करण्यात येईल. यामध्ये शासकीय नियमानुसार दारिद्रय रेषेखाली रुग्णांना, सिकल सेल, ॲनिमिया, हिमोफेलीया, थॅलीसिमिया व इतर रक्त संबंधीत आजार या रुग्णांना मोफत रक्त पुरवठा करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग रुग्णालयात डॉक्टर नसल्याने उपचाराअभावी रुग्णाचा झालेला मृत्यु**

**(३) १९४९२ (१४.८.२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग रुग्णालयात डॉक्टर नसल्याने उपचाराअभावी रुग्णाचा मृत्यु झाल्याने सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशी करण्यासाठी सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ.पाटील यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७.३.२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी अनधिकृतपणे गैरहजर असल्याचे आढळून आले आहे.

(३) संबंधित जबाबदार वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली असून अनधिकृत गैरहजेरीबाबत त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात सन २००९ ते २०१३ या कालावधीत रुग्णांवर उपचार केलेल्या वैद्यकीय बिलाचा खर्चाचा परतावा देण्याबाबत**

**(४) १९६७८ (१४-०८-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात सन २००९ ते २०१३ या कालावधीत रुग्णांवर उपचार केलेल्या वैद्यकीय बिलाचा खर्चाचा परतावा अद्यापपर्यंत देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा परतावा अद्यापही न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, किती रुग्णालयांना किती रुपयांचा परतावा देणे बाकी आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०३-२०१६) :** (१) नाही. कोल्हापूर जिल्हयातील रुग्णालयांची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत केलेल्या उपचारांची थकबाकी प्रलंबित नसुन जुन्या जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णालयांची मार्च, २०१४ अखेर रु. ६.७८ कोटी एवढी थकबाकी प्रलंबित होती. त्यापैकी आतापर्यंत रु. ४.११ कोटी एवढी रक्कम मंजुर करण्यात आली असुन आज दिनांकास रु. २.६७ कोटी एवढया रक्कमेची देयके प्रलंबित आहेत.

(२) राज्यात दिनांक २१.११.२०१३ पासुन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु झाल्याने सदर योजना बंद करण्यात आली. त्यामुळे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पामध्ये कमी तरतुद उपलब्ध झाल्यामुळे तसेच पुरवणी मागणीचे प्रस्ताव मान्य न झाल्याने थकबाकी अदा करता आलेली नाही.
(३) सदर योजनेंतर्गत आज दिनांकास ४७ रुग्णालयांची रु. ५२.३२ कोटी एवढ्या रक्कमेची देयके प्रलंबित आहेत.
(४) जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूद विचारात घेऊन संबंधित रुग्णालयांची देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच उर्वरित प्रलंबित देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध होण्यासंबंधाने वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत नाही.

---

### लिंगनिदानातून होणारे गर्भपात रोखले जावेत या हेतूने जळगांव जिल्ह्यातील सोनोग्राफी यंत्रांना "ॲक्टिव्ह ट्रॅकर" लावण्याबाबत

**(५) १९७४६ (१७-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण वाढावे व लिंगनिदानातून होणारे गर्भपात रोखले जावेत या हेतूने जळगांव जिल्ह्यातील सोनोग्राफी यंत्रांना "ॲक्टिव्ह ट्रॅकर" लावण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात आयएमए, स्त्रीरोगतज्ञ व रेडिओलॉजिस्ट यांनी एक लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरूप काय आहे,
(४) अद्याप, कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) याबाबत केंद्र शासनाने सहसचिव (आरसीएच) यांचे अध्यक्षतेखाली तज्ञांची समिती गठित करण्यात आली असल्याचे दिनांक १९ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. केंद्र शासन स्तरावरील कमिटी यावर अभ्यास करित असून त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
तसेच राज्यस्तरावर मा. आयुक्त (कुटुंब कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञांचा समावेश असलेल्या समितीची बैठक दिनांक ०८.०७.२०१५ रोजी घेण्यात आली. त्यात झालेल्या निर्णयानुसार ॲक्टीव्ह ट्रॅक्टर मशिन कार्यान्वित न करण्याबाबतच्या सुचना अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे यांनी दि. २४.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, जळगांव यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील रुग्णांना सिटीस्कॅन करीता वडखळ पनवेल येथे जावे लागत असल्याबाबत

**(६) २०३८८ (१४-०८-२०१५). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील रुग्णांना सी.टी. स्कॅन करीता वडखळ पनवेल येथे जावून अडीच ते तीन हजार रुपये खर्च करावा लागत असल्यामुळे रुग्णांमध्ये तिव्र असंतोषाची भावना पसरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे. जिल्हा रुग्णालय, रायगड, अलिबाग येथील सी.टी.स्कॅन मशीन उपजिल्हा रुग्णालय, माणगाव, जि.रायगड येथे स्थलांतरीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे अलिबाग येथील रुग्णांना सिटीस्कॅन करीता वडखळ येथे जावे लागते.

(२) व (३) रुग्णांची गैरसोय होऊ नये यास्तव वडखळ -पनवेल येथे खाजगी सी.टी.स्कॅन सेंटर मध्ये ४ गरजू रुग्णांवर सी.टी.स्कॅन चाचण्या करण्यात आलेल्या आहेत. त्यावरील खर्च रुग्ण कल्याण समितीच्या अनुदानातून भागविण्यात आला आहे.

---

## रायगड जिल्हा रुग्णालयात परिचारिकांची पदे रिक्त असल्यामुळे जिल्ह्यातील रुग्ण सेवेवर परिणाम झाल्याबाबत

**(७) २०४१२ (१४-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा रुग्णालयात परिचारिकांची पदे रिक्त असल्यामुळे जिल्ह्यातील रुग्ण सेवेवर परिणाम होऊन सार्वजनिक आरोग्य हित धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही. रायगड जिल्हा रुग्णालयातील परिचारिकांच्या मंजूर १५१ पदांपैकी १२९ पदे भरलेली आहेत.

(२) व (३) रायगड जिल्हा रुग्णालयातील रिक्त २२ पदे पदोन्नतीने सरळसेवा भरती प्रक्रीयेद्वारे तसेच बंधपत्रीत कालावधी पूर्ण झालेल्या उमेदवारांना ११ महिन्यांकरिता अस्थायी नियुक्ती देऊन रिक्त पदे भरण्यात येत आहेत.

---

**वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट यांच्यावरील दाखल तक्रारीबाबत अद्यापि कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याबाबत**

**(८) २०४३० (१७-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.देशमुख व वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, हिंगणघाट यांच्यावरील दाखल (गैरवर्तन-गैरशिस्त) तक्रारीबाबत अद्यापी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही याबाबत आमदार (अचलपूर) यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी शासनास पत्र लिहून विचारणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०३-२०१६) :**(१) नाही.

श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, विधानसभा सदस्य, अचलपूर यांनी दिनांक २७.०५.२०१५ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने डॉ. देशमुख यांच्या गैरवर्तणूकीबाबत चौकशी करण्यात आली असून त्यानुसार कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(२) चौकशी अहवालाच्या अनुषंगाने डॉ. देशमुख, वैद्यकीय अधिक्षक यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सर्पदंश, श्वानदंश, विषबाधा यासाठी प्रतिबंधात्मक लस उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९) २१०९६ (१७-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या वतीने सर्पदंश, श्वानदंश, विषबाधा यासाठी प्रतिबंधात्मक लस उपलब्ध करुन दिली जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रुग्णालयाबाहेर खाजगी रुग्णालयाच्या मागणीनुसार सदर लसीचा पुरवठा केला जातो काय,

(३) नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय,

(४) आगामी काळात खाजगी रुग्णालयांना सदर लस उपलब्ध करुन देणार आहेत काय ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :** (१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील रुग्णालयांमधून सर्पदंश, श्वानदंश यावरील लस मोफत उपलब्ध करुन देण्यात येते.

(२), (३) व (४) खाजगी रुग्णालयांना शासनामार्फत सर्पदंश, श्वानदंश यावरील लसीचा पुरवठा करण्याबाबत शासनाचे धोरण नाही.

---

## नागपूर शहरात औद्योगिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कामगारांकरिता कामगार रुग्णालयातील पदे भरण्याबाबत

**(१०) २१२९१ (१४-०८-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात औद्योगिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कामगारांकरिता कामगार रुग्णालय आहे तसेच दक्षिण नागपूरातील सोमवारी पेठेतील राज्य कामगार विमा रुग्णालयातील विविध संवर्गातील ५० टक्के जागा रिक्त असल्यामुळे येथील रुग्णसेवा प्रभवित झाली असल्याचे दिनांक ९ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात सुमारे १ लक्ष कामगार असून ह्या दवाखान्यात डॉक्टर व इतर कर्मचारी ह्यांची संख्या अपूरी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उपचाराकरिता लागणारे यंत्र सर्व प्रकारची सामुग्री येथे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन या ठिकाणी रिक्त असलेल्या जागा भरणार आहे काय, तसेच याठिकाणी निधी उपलब्ध करुन देणार आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, नागपूर येथे गट-अ संवर्गाची ३५ पेकी ९, गट-ब, संवर्गातील सर्व ३, गट-क संवर्गाची १२९ पैकी ७३, गट-ड संवर्गाची १६५ पैकी १०९ पदे रिक्त आहेत.

या रुग्णालयांतर्गत १.३२ लाख नोंदणीकृत विमाधारक आहेत. तेथील रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून केंद्र शासनाच्या कामगार राज्य विमा महामंडळाकडून अंशकालीन विशेषज्ञांची नियुक्ती केली गेली आहे. तसेच राज्य शासनाकडून बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांची व परिचारीकांची नियुक्ती केली गेली आहे. अशाप्रकारे रुग्णांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) अंशत: खरे आहे. या रुग्णालयातील काही संत्रसामुग्री जुनी झाली असल्यामुळे, तसेच काही यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्यामुळे, एकूण ११ मोठ्या प्रकारच्या वैद्यकीय यंत्रांची व उपकरणांची खरेदी करण्याची कायवाही सुरु आहे.

(४) सदर रुग्णालयातील विशेषज्ञांची ४ पदे भरण्यात आली आहेत. लिपिक संवर्गातील २ पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्यात आली आहेत. सदर रुग्णालयामध्ये वेद्यकीय उपकरणांचे २४ नग खरेदी करण्यात आले असून त्याकरिता रुपये ९,२६,९७४/- खर्च करण्यात आले आहेत.

---

**नागपूर शहरातील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु असलेल्या खाजगी रुग्णालयात कार्यालयाची वेळ कमी असल्याने रुग्णांना अडचण येत असल्याबाबत**

**(११) २१३१९ (१०-०८-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु असलेल्या खासगी रुग्णालयात या योजनेचे कार्यालय ६ ते ८ तासांकरिताच सुरु राहत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गंभीर आजार व त्याचा उपचाराचा खर्च न पेलावणाऱ्या गोर गरिब रुग्णांना अडचण येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन यावर काय उपाययोजना करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०३-२०१६)** :(१) व (२) नाही. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत खाजगी तसेच शासकीय रुग्णालयांमार्फत २४x७ तास सेवा देण्यात येतात.

योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व आजारांवर योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यांना उपचार देण्यात येतात. आतापर्यंत नागपुर जिल्ह्यात योजनेंतर्गत २८८१४ उपचार/शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दोन मुलींवर कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या पाल्यांना प्रोत्साहन निधी देण्याबाबत**

**(१२) २१५०६ (०२-०९-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दोन मुलींवर कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या पाल्यांचा सत्कार करुन त्यांना आरोग्य विभागाच्या वतीने प्रोत्साहन निधी देण्याची योजना राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या हलगर्जीपणामुळे सन २००७ पासून सुमारे २००० लाभार्थ्यी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे जून, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे, तसेच वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांना शासन प्रोत्साहन निधी देणाच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

राज्यात एक किंवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या दारीद्रय रेषेखालील लाभार्थ्यांकरीता सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना दि. २४ एप्रिल, २००७ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येते.

(२) हे खरे नाही.

जिल्हा परिषद गोंदिया मध्ये सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेअंतर्गत एप्रिल, २००७ ते मार्च, २०१५ अखेरपर्यंत एकूण प्राप्त १३६९ प्रकरणे व प्रलंबित १८४ प्रकरणे अशी एकूण १५५३ प्रकरण आहेत. त्यापैकी १४६६ पात्र लाभार्थ्यांना सदर योजनेअंतर्गत आर्थिक लाभ देण्यात आला आहे. उर्वरित ८७ अपात्र प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत. तसेच एप्रिल-जून २०१५ या कालावधीतील प्राप्त एकूण २५४ प्रलंबित प्रकरणांकरीता अनुदान वितरीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बेळगांव येथील के.एल.ई.हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ मिळण्याबाबतचा प्रस्ताव

**(१३) २१८३६ (१७-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील शेकडो रुग्ण हृदय शस्त्रक्रियेसाठी के.एल.ई हॉस्पिटल बेळगाव येथे दाखल होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईपेक्षा या जिल्ह्यातील रुग्णांना बेळगाव येथे उपचार घेणे सोयीचे व कमी खर्चाचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ के.एल.ई.हॉस्पिटल बेळगांव येथे रुग्णांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर हॉस्पिटल मध्ये महाराष्ट्र सरकार मार्फत ही योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन सदर प्रस्ताव तात्काळ मान्यता देणेविषयी कार्यवाही करणार आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०३-२०१६) :**(१) व (२) सदर रुग्णालय हे राज्याबाहेरील (कर्नाटक राज्य) खाजगी रुग्णालय असल्याने याबाबतची निश्चीत आकडेवारी उपलब्ध नाही. तथापि कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून बरेच रुग्ण बेळगांव येथे जातात, हे खरे आहे.

(३) होय.

(४) व (५) के.एल.ई. रुग्णालय, बेळगांव या रुग्णालयाचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तथापि सदर रुग्णालयाचा समावेश राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती. सद्य:स्थितीत विमा कंपनीबरोबर केलेल्या करारामध्ये योजनेंतर्गत राज्याबाहेरील रुग्णालये अंगीकृत करण्याची तरतुद नसल्यामुळे सदर विनंती अमान्य करण्यात आली आहे. तथापि, आता राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा करार दि. २० नोव्हेंबर, २०१५ रोजी संपुष्टात येत असल्याने योजनेमध्ये काही बदल करुन योजना राज्यात एकाच टप्प्यात लागु करण्याची बाब विचाराधीन आहे. प्रस्तावित बदलांमध्ये परराज्यातील रुग्णालयांचा समावेश योजनेमध्ये करण्याची बाब विचाराधीन आहे.

---

## सर्पदंशावरील आयुर्वेदीक औषध राज्य शासनाने खरेदी करणेबाबत

**(१४) २१८७८ (१७-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) येथील भुराडी आयुर्वेदीक फार्मासीटीकल या आयुर्वेदीक कंपनीने सर्पदंशावरील आयुर्वेदीक गोळी तयार केली असून सदरची आयुर्वेदीक गोळी राज्य शासनाने खरेदी करुन ती राज्यातील सर्व शासन रुग्णालयांमध्ये उपलब्ध करुन देणेबाबतची मागणी भराडी आयुर्वेदीक फार्मासीटीकल या आयुर्वेदीक कंपनीने तसेच राज्य शासनाच्या हॉस्पीटल विभागाने राज्य शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची सर्पदंशावरील गोळी खरेदी करणेबाबत राज्य शासनाच्या आरोग्य खरेदी विभागाने निवीदा क्र.ई १७३ नुसार प्रसिध्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या आरोग्य खरेदी विभागाने सदरची निवीदा तीनवेळा प्रसिध्द करुनही राज्य शासनाच्या औषध खरेदी विभागाकडून याबाबत दिरंगाई करण्यात येत असल्याने सदरची आयुर्वेदीक गोळी अनेक रुग्णालयांना उपलब्ध करुन देणेस अडचणी निर्माण झाल्या आहेत याबाबत राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात राज्य शासनाने सदरची आयुर्वेदीक गोळी खरेदी करणेबाबत कोणता निर्णय घेतला आहे निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

सर्पदंशावरील Oral herbal antivenom tablet (पिनाक आयुर्वेदीक गोळी) खरेदी करण्यासाठीनिविदा राबविण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये दोन मुदतवाढी नंतर मे.श्री.भराडी आयुर्वेदीक फार्मास्युटिकल्स या एकाच निविदाधारकाने भाग घेतला होता.

(३) व (४) पिनाक आयुर्वेदीक गोळ्यांची सदर खरेदी ही प्रायोगिक तत्वावर करण्यात येत आहे.

सर्पदंशावरील उपचारासाठी लागणारी लस सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रुग्णालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असून संबंधित निविदाधारकाकडून सदर गोळीच्या उत्पादन खर्चाचा तपशील तसेच आयुर्वेद संचालनालयातील तंज्ञाचे अभिप्राय प्राप्त करुन यासंदर्भात पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

---

**नागपूर जिल्ह्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याबाबत.**

**(१५) २२१३६ (१४-०८-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याने तसेच दुरुस्तीचा खर्च अधिक असल्यामुळे त्या बंद अवस्थेत असल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्यामुळे रुग्णांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार तातडीने रुग्णवाहिका पुरविण्याच्या दृष्टीने शासन कोणते प्रयत्न करणार आहे वा करित आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यांतर्गत एकूण ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्व ठिकाणी रुग्णवाहिका पुरविण्यात आलेल्या आहेत. यापैकी प्राथमिक आरोग्य केंद्र, खात व प्राथमिक आरोग्य केंद्र, करवाही येथील वाहन मेजर दुरुस्ती करीता कार्यशाळेत जमा आहे तथापि जिल्हा परिषद, नागपूरकडे अतिरिक्त असलेले वाहन तात्पुरत्या स्वरुपात पुरविण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथील रिक्त पदांबाबत**

**(१६) २२१६२ (१७-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय चंद्रपूर यांनी दिनांक १८ मे, २०१५ ला जा.क्र/सारु च/नियोजन /पदेभरणे/प्रस्ताव /९३७१-८४/१५ अन्वये संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालय-१, उपजिल्हा रुग्णालय-३, ग्रा, रुग्णालय-१० अशी एकूण जिल्हयातील १४ रुग्णालयात ३०४ पदे रिक्त आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथील वैद्यकीय अधिकारी वर्ग १ ची २० मंजूर पदांपैकी १२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासदंर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच अनुषंगाने रिक्त पदे भरण्यात आली आहे काय,
(६) नसल्यास, होणाऱ्या विलंबाचे कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४), (५) व (६) स्वतंत्र निवड मंडळामार्फत सप्टेंबर व नोव्हेंबर, २०१५ मध्ये वैद्यकीय अधिकारी यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली असून वर्ग ३ व ४ ची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**खेड (जि.रत्नागिरी) येथील तालुका पंचायत समितीच्या ४८ पैकी १२ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे भाड्याच्या जागेत असल्याने रुग्णांची झालेली गैरसोय**

**(१७) २२२६८ (१४-०८-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) येथील तालुका पंचायत समितीच्या ४८ पैकी १२ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे भाड्याच्या जागेत असल्याने अनेक रुग्णांची गैरसोय होते तसेच कर्मचाऱ्यांना त्रास होत असल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील रुग्णांना आरोग्य सेवा तसेच केंद्रांना जागा उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, त्या निर्णयाची अंमलबजावणी शासनामार्फत करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही. खेड, जिल्हा रत्नागिरी येथील ४८ उपकेंद्रांपैकी ११ उपकेंद्रे भाड्याच्या जागेत असून येथे रुग्णांची गैरसोय वा कर्मचारी यांना त्रास होत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) दिनांक २५.०५.२०१२ च्या शासन निर्णयानुसार जमिन उपलब्ध नसेल तर मंजूर उपकेंद्र अन्य गावात स्थलांतरीत करावे असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार ३ उपकेंद्र स्थलांतरीत करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. उर्वरित उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध करणेसंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेमार्फत संबंधित ग्रामपंचायतींशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच जिल्हा परिषद व जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने जागा मिळविण्याचे प्रयत्न सुरु असून वैद्यकीय अधिकारी यांच्या मासिक आढावा बैठकीत याबाबत चर्चा करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयात सन २०१४ -१५ या वर्षात ६६ गर्भवती महिलांचा मृत्यु झाल्याबाबत**

**(१८) २२३०९ (१४-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गर्भवती माता आणि बालकांच्या संगोपनासाठी कोट्यवधी रुपये खर्चून केंद्र, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अनेक योजना राबविल्या जातात, मात्र गर्भवती मातांच्या मृत्यूचे प्रमाण घटत नाही. सर्व सोयीसुविधा असूनही पुणे शहराच्या हद्दीत सन २०१४-१५ या वर्षात तब्बल ६६ गर्भवती महिलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील गर्भवती माता मृत्यूंची गंभीर दखल घेवून हे माता मृत्यू रोखण्यासदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, उपाययोजना केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. २८ मे २०१० च्या शासन निर्णायान्वये वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मनपा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या मातामृत्यू गुणवत्ता अभिवचन समिती, पुणे महानगरपालिका मार्फत पुणे शहरामध्ये झालेल्या प्रत्येक मातामृत्यूचे अन्वेषण करण्यात आले आहे. तसेच आयुक्त, मनपा यांच्या अध्यक्षतेखाली दर तिमाही शहराच्या हद्दीत होणाऱ्या मातामृत्यूंचा नमुना पध्दतीने आढावा घेण्यात आलेला आहे.

माता मृत्यू अभिवचन समितीच्या शिफारशीनुसार गर्भवती महिलांच्या मृत्यूचे प्रमाणे कमी करण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात येतात.

जननी सुरक्षा योजने अंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्रय रेषेखालील प्रवर्गातील गर्भवती लाभार्थींना शासकीय अथवा शासन मानांकित संस्थेत प्रसुती अथवा सिझेरीयन शस्त्रक्रिया झाल्यास आर्थिक लाभ देण्यात येतो. तसेच जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर मातेस तिच्या निवास स्थानापासून ते शासकीय आरोग्य संस्थेपर्यंत ये-जा करण्याकरिता मोफत शासकीय वाहन उपलब्ध करुन दिले जाते. शासकीय आरोग्य संस्थेत

प्रसूतीनंतर साधारण प्रसुती झालेल्या मातेस ३ दिवस व सिझेरियन प्रसुती झालेल्या मातेस ७ दिवस मोफत आहार दिला जातो. मोफत प्रसुती व सिझेरियन सेक्शन, मोफत आहार, मोफत प्रयोगशाळा तपासण्या आणि मोफत औषधोपचार व गरजेनुसार रक्तपुरवठा पुरविला जातो. तसेच प्रसुती दरम्यान होणाऱ्या माता मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर माता नोंदणी, लोहयुक्त गोळ्या वाटप, मातांना धर्नुवात प्रतीबंधक लसीकरण, जोखमीच्या अवस्थेबाबत तपासणी व समुपदेशन, तज्ञांकडून तपासणी, तीव्र रक्ताक्षयासाठी शिरेतून इंजेक्शन आयर्न सुकरोज, नवसंजीवनी योजनेंतर्गत आदिवासी जिल्हयात मातृत्व अनुदान योजनेंतर्गत आर्थिक लाभ दिला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील रसायनी कासांबे-मोहोपाडा येथे रायगड जिल्हा परिषदेने सुमारे १० वर्षापूर्वी मंजूर केलेले प्राथमिक आरोग्य केंद्र अद्यापि कार्यान्वित न झाल्याबाबत**

**(१९) २२४९२ (१४-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील रसायनी कासांबे-मोहोपाडा येथे रायगड जिल्हा परिषदेने सुमारे १० वर्षापूर्वी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १० वर्षापूर्वी मंजूर असलेले आरोग्य केंद्र अद्यापी कार्यान्वित न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, औद्योगिकरणामुळे मोहोपाडा वभार्ली ग्रामपंचायतीच्या हद्दीमधील गावाची लोकसंख्या वाढली असून जवळ कोणतेही आरोग्य केंद्र नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही. वासांबे-मोहोपाडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर नसून उपकेंद्र मंजूर आहे.

(२) वासांबे-मोहोपाडा उपकेंद्रे प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप ता.खालापूर अंतर्गत कार्यरत आहेत. दर उपकेंद्राचे बांधकाम दिपांक ३१.०३.२०११ रोजी पूर्ण झाले असून उपकेंद्र कार्यान्वित आहे. या उपकेंद्रांतर्गत मोहोपाडा, चांभार्ली, तळेगाव व पानशिल अशा ४ गावांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई तसेच पुण्यामध्ये सन २०१४-१५ मध्ये १५ वर्षाखालील मुलींचे गर्भपात करण्याचे प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२०) २२५४५ (१७-०९-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये सन २०१४-१५ मध्ये १५ वर्षाखालील मुलींचे गर्भपात करण्याचे प्रमाण ६७ टक्के असल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील गर्भपात करणा-या केंद्रातून जमा केलेल्या माहितीच्या आधारे सन २०१३-१४ मध्ये गर्भपात करणा-या १११ मुली या १५ वर्षाखालील आहेत तसेच सन २०१४'१५ मध्ये १८५ मुली १५ वर्षाखालील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे शहर व परिसरात मागील वर्षभरात १० ते १८ वयोगटातील ८१५ अल्पवयीन मुलींचा गर्भपात करण्यात आल्याची बाब पुणे महानगरपालिकेच्या अहवालातून माहे मे, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर गुन्ह्याबाबत (मुलीची माहिती गुप्त ठेवून) अल्पवयीन मुलींच्या अज्ञानाचा गैरफायदा घेणा-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१३-१४ मधील आकडेवारी बरोबर आहे. परंतु २०१४-१५ मध्ये गर्भपात करण्यात आलेल्या १५ वर्षाखालील मुलींची संख्या १४० इतकी आहे.

(३) माहे मे, २०१४ ते माहे मार्च, २०१५ दरम्यान पुणे शहर व परिसरातील सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये १५ ते १९ या वयोगटातील एकूण ८१५ मुलींचा गर्भपात करण्यात आल्याची नोंद आहे.

(४) वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ नुसार गर्भपात करणेस मान्यता आहे. तथापि मुलींच्या अज्ञानाचा गैरफायदा घेतला जाऊ नये यासाठी अर्श कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड जिल्हयात आरोग्य विभागाच्या मंजूर पदाच्या आकृत बंधामध्ये जिल्हा परिषद बीड अंतर्गत विविध संवर्गातील १८५ पदे दर्शविण्यात आली नसल्याबाबत

**(२१) २२५७९ (१४-०८-२०१५). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात दिनांक ६ ऑगस्ट, २००७ च्या आरोग्य विभागाच्या मंजुर पदाच्या आकृती बंधामध्ये जिल्हा परिषद बीड अंतर्गत विविध संवर्गातील १८५ पदे दर्शविण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे न भरल्यामुळे बीड जिल्हयातील जनतेचे आरोग्य धोक्यात असुन त्यांना वेळोवेळी व वेळेवर आरोग्य सेवा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्य सेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे त्यामुळे सदरची पदे केव्हा भरती करण्यात येतील,
(४) शासन निर्णय असुन सुध्दा आकृती बंधामध्ये पदे कमी दर्शविल्यामुळे रोस्टर तपासणीला अडचणी निर्माण झालेल्या आहेत, यास जबाबदार असणा-या दोषीवर काय कारवाई करण्यात आली आहे,
(५) असल्यास, उक्त पदे भरती करण्यात दिरंगाई होत असल्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०३-२०१६)** :(१) होय. तथापि, सदर पदे १८५ नसून १८१ आहेत. सदर शासन निर्णयात जिल्हा परिषदेंतर्गत आरोग्य संस्थांची जिल्हानिहाय आकडेवारी दिली नसून संवर्गनिहाय आकडेवारी दिली आहे.
(२), (३) व (४) विभागातील आरोग्य संस्थांच्या आकृतीबंधात सुधारणा करण्याची कार्यवाही प्रगतीत असून त्यानुसार बीड जिल्हयातील आरोग्य संस्थांच्या मजूर पदांच्या आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पदे मंजूर करण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंडलवाडी, (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयाचा शासनाच्या बृहत आराखडयामध्ये समावेश करण्याबाबत**

**(२२) २२६६० (१४-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंडलवाडी, (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयाचा शासनाच्या बृहत आराखडयामध्ये समावेश करण्याची मागणी माहे मार्च, २०१५ मध्ये लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी आतापर्यंत काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) कुंडलवाडी, जि.नांदेड येथे कार्यान्वित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागी ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव प्रचलीत निकषानुसार तपासून तो शासनास सादर करण्याबाबत संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना सूचीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारध (ता.भोकरदन, जि.जालना) येथील आरोग्य उपकेंद्राची अवस्था दयनीय झाल्याबाबत**

**(२३) २३८१७ (१७-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारध (ता.भोकरदन, जि.जालना) येथील आरोग्य उपकेंद्राची अवस्था दयनीय झाली असून या उपकेंद्राभोवती गाजर गवत मोठ्या प्रमाणात वाढल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाने लाखो रुपये खर्चून या आरोग्य उपकेंद्राची इमारत बांधलेली असून देखभाली अभावी ही इमारत समस्यांच्या विळख्यात सापडलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील स्वच्छतागृहचा दरवाजा गेल्या कित्येक वर्षापासून तुटलेला असल्याने हे स्वच्छतागृह वापराविनाच आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आरोग्य उपकेंद्राची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

आरोग्य उपकेंद्र, पारध जि.जालना स्वत: च्या इमारतीत कार्यान्वित असून या उपकेंद्राच्या इमारतीत आरोग्य सेविका राहत आहेत या उपकेंद्राची अवस्था दयनीय झाली असल्याचे मे, २०१५ वा त्या सुमारास आढळून आलेले नाही.

या उपकेंद्रामार्फत प्रथमोपचार, प्रसूतीपूर्व मातांची तपासणी व किरकोळ आजारावर औषधोपचार, कुटुंबकल्याण, माताबालसंगोपन विषयक सल्ला व सेवा या बरोबरच क्षयरोग, कुष्ठरोग व हिवतापाच्या रुग्णांचा शोध व उपचार केला जातो.

(३) हे खरे नाही.

सदर इमारतीमधील स्वच्छता गृह सूस्थितीत असून त्याचा वापर करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत काही रुग्णालयांमध्ये उपचार केले जात नसल्याबाबत**

**(२४) २३९७५ (१४-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही योजना केशरी व पिवळे रेशनकार्ड धारकांसाठीच होती, परंतु या योजनेचा फायदा आता पांढऱ्या रेशनकार्ड धारकांनाही मिळणार असल्याचे दिनांक ६ जून, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या लहान मुलांमध्ये अनेक गंभीर स्वरूपाचे आजार फैलावत असल्याने ० ते १८ वयोगटातील मुले याचे लाभार्थी ठरणार आहेत, असेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या काही रूग्णालयांमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत उपचार केले जात नाहीत याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०३-२०१६)** :(१) नाही.
(२) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांसाठी वयाची कोणतीही अट नसल्याने योजनेंतर्गत ० ते १८ वयोगटातील बालकांवर उपचार केले जात असून आतापर्यंत या वयोगटातील ५२१४९ रुग्णांवर उपचार/शस्त्रक्रिया करण्यात आले आहेत.
(३) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांतून लाभार्थी रुग्णांना वैद्यकिय उपचार केले जात आहेत. तथापि एखाद्या रुग्णालयाने उपचार करण्यास नकार दिल्या अथवा समाधानकारक सेवा न दिल्याची तक्रार आल्यास त्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित रुग्णालयावर कारवाई केली जाते.

---

**कणकवली (जि.सिंधुदुर्ग) उपजिल्हा रुग्णालयातील विविध ६ बांधकामाच्या अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत**

**(२५) २४५३१ (१४-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) उपजिल्हा रुग्णालयातील येथील विविध ६ बांधकामाच्या अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत याविषयी संचालक, आरोग्यसेवा, आरोग्यसेवा संचालनालय यांनी ९० लाख ४८ हजार ९०० रुपयांचा एक प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेबाबत प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जी.टी. रुग्णालय संकुल, मुंबई यांचेकडे पत्र क्र.संआसे कक्ष-३/टे-६/बांधकाम कणकवली दुरु/३-६८०-३८२/१५, दिनांक २९ जानेवारी, २०१५ अन्वये सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ९० लाख ४८ हजार ९०० रुपये इतक्या किमतीच्या अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध बाबतच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे काय,
(३) नसल्यास, सदरहू प्रस्तवास अद्यापी प्रशासकीय मान्यता देण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांनी पाठविलेल्या सदरहू प्रस्तावास विनाविलंब शासनाची मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०३-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) होय, दि.११.०३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये उपजिल्हा रुग्णालय, कणकवली जि.सिंधुदुर्ग येथील विविध बांधकामांच्या रु.९०.४८ लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता

देण्यात आली आहे. तसेच जुलै, २०१५ च्या पावसाळी अधिवेशनात सदर कामाकरिता रु.४२.२५ लक्ष इतके अनुदान पुरवणी मागणीव्दारा मंजूर करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील सोळा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात नर्स, डॉक्टर आणि इतर कर्मचारी मुख्यालयात नसल्याबाबत**

**(२६) २४८६४ (१७-०८-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील सर्वच सोळा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात नर्स, डॉक्टर आणि इतर कर्मचारी मुख्यालयात हजर नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुसद तालुक्यातील फेट्रा येथे तेंदूपत्ता तोडणाऱ्या मजुरावर हल्ला केल्याने ते गंभीर जखमी झाले असता त्यांना फेट्रा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती केली असता तेथे कुणीही कर्मचारी जागेवर नव्हते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्तबाबत संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) दोन्ही वैद्यकीय अधिकारी व अन्य सहा कर्मचारी गैरहजर होते. हे खरे आहे.
(३) प्राथमिक आरोग्य केंद्र, फेट्रा, ता.पुसद येथील गैरहजर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हा परिषदेच्या आरोग्य केंद्र व एमबीबीएस व इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२७) २५२०७ (१७-०८-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली या मागास जिल्हयात राज्य शासनाच्या तसेच जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवेशिवाय अन्य आरोग्यसेवा नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४५ आरोग्य केंद्रे, ३ उपजिल्हा रुग्णालये, ८ ग्रामीण रुग्णालये व १ जिल्हा सामान्य रुग्णालयावर संपूर्ण जिल्हयाची आरोग्य यंत्रणा काम करते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू आरोग्य यंत्रणा अपुरी असून, एमबीबीएस व इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागतो व त्यात रुग्ण दगावण्याची शक्यताही वाढते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तातडीने गडचिरोली जिल्हयातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी शासन निर्णय घेणार आहे काय,
(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
अन्य आरोग्य सेवा उपलब्ध आहेत.
(२) हे खरे नाही.
बहुतांश रिक्त पदे भरण्यात आली आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालयातील एम.आर.आय व सिटीस्कॅन तंत्रज्ञाची रिक्त पदे भरणेबाबत**

**(२८) २५३२४ (१७-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयासह राज्यातील सर्व सामान्य रुग्णालयांना शासनाने एम.आर.आय. व सिटीस्कॅन उपकरणे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी संबंधीत उपकरणांच्या तंत्रज्ञांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे सदर उपकरणे वापरात नसल्याची बाब खरी आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या वतीने तंत्रज्ञांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जाहिरात प्रसिध्द केली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जाहिरात प्रक्रियेतील परिक्षेनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांमधून सद्यस्थितीत रिक्त असलेली तंत्रज्ञांची सर्व पदे भरण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०३-२०१६) :**(१) रुग्णालयांना उपलब्ध करुन द्यावयाच्या यंत्रसामुग्रींच्या प्रचलीत निकषांनुसार जिल्हा रुग्णालयांकरीता एम.आर.एय. ही सुविधा उपलब्ध नाही. सद्यस्थितीत आरोग्य सेवा संचलनालयाच्या अखत्यारितील ०९ जिल्हा रुग्णालये, १ सामान्य रुग्णालय व १ विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे सी.टी. स्कॅन मशीन कार्यान्वित आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त संस्थांतील तंत्रज्ञांची रिक्त पदे भरण्यासाठी ऑक्टोबर, २०१४ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहू पदभरती वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या संस्थांतील रिक्त पदे भरण्यासाठी असल्याने सदर पदभरती प्रक्रियेतून आरोग्य विभागाच्या अखत्यारितील तंत्रज्ञांची रिक्त पदे भरता येणे शक्य नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील रुग्णालयांतर्गत सी.टी. स्कॅन विभागाकरीता आवश्यक असलेली तंत्रज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्या अनुषंगाने सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सोनोग्राफी केंद्रावर बसविण्यात येणाचा सायलेंन्ट ऑब्जर्व्हरबाबत**

**(२९) २५३५१ (१७-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाढत्या भ्रुणहत्या रोखण्यासाठी कायद्याने लिंग निदान चाचणीवर बंदी घालण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी सोनोग्राफी कैंद्रांवर सायलेन्ट ऑब्जर्व्हर कार्यान्वीत करण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात एकुण किती सोनोग्राफी केंद्र आहेत व किती केंद्रावर सायलेन्ट ऑब्जर्व्हर कार्यान्वीत करण्यात आले आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यात एकुण ९७५८ इतके सोनोग्राफी केंद्रे असून त्यापैकी ६१८९ कार्यान्वित, बंद ८४७ व कायमस्वरुनी बंद केंद्रे २७२२ आहेत. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी जिल्ह्यातील २८२ सोनोग्राफी मशींन्सना (ग्रामीण भागामध्ये १३० केंद्र व महानगरपालिका क्षेत्रात १५२ केंद्र) प्रायोगित तत्वावर एस.आय.ओ.बी. ही यंत्रणा बसविण्यात आली होती. सदरचा निर्णय जिल्हा प्रशासनामार्फत घेणेत आला होता. राज्यात अन्यत्र कोठेही ही यंत्रणा कार्यान्वित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दयापूर (जि.अमरावती) तालुक्यातील अंजनगाव सुर्जी येथे ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळण्याबाबत**

**(३०) २५६०६ (१४-०८-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर, (जि.अमरावती) तालुक्यातील अंजनगाव सुर्जी यथे ग्रामीण रुग्णालय असून त्याचे श्रेणीवर्धन करुन उपजिल्हा रुग्णालयाच्या दर्जा मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री यांना दिनांक १२ डिसेंबर, २०१४ व दिनांक १६ मार्च, २०१५ या पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत काय कार्यवाही करण्यात आली ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे.

---

**मौजे करखेली (ता.धर्मीबाद, जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधेबाबत**

**(३१) २५९३८ (१७-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे करखेली (ता.धर्मीबाद, जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधा नसून तसेच वैद्यकीय अधिकारी रुग्णालयात राहत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर न राहणा-या या वैद्यकीय अधिका-यावंर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
करखेली ता.धर्माबाद, जि.नांदेड येथील प्रा.आ.केंद्रात वैद्यकीय अधिकारी कर्तव्यावर नेहमी गैरहजर राहून कसूर करत असल्याबाबतची तक्रार माहे एप्रिल, २०१५ मध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड कार्यालयास प्राप्त झाली आहे.
(२) सदरील तक्रारीच्या अनुषंगाने अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मार्फत चौकशी अहवालानुसार प्रा.आ.क्रेंद्र, करखेली, ता.धर्माबाद येथीज व्दितीय वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी वास्तव्य करुन रहात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार कारणे दाखवा नोटीसा बजावून खुलासा मागविण्यात आलेला आहे व संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत प्रा. आ. केंद्राचे कामकाज सुरळीत चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निमगाव (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची झालेली दुरवस्था**

**(३२) २५९८५ (१७-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निमगाव (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत ही सन २०११ मध्ये निर्लेखित केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २८ मे, २०१५ रोजीच्या वादळी वाऱ्यामुळे या प्रा.आ.केंद्राच्या इमारतीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे याची देखील शासनास माहिती आहे काय,
(३) असल्यास, या इमारतीची झालेली दुरवस्था लक्षात घेता याठिकाणी नविन इमारत बांधण्याची आवश्यकता आहे, हे देखील खरे आहे काय,
(४) असल्यास, नविन इमारत बांधकामासाठी शासन तातडीने काही कार्यवाही करणार आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) स्थानिक प्रशासनाकडून इमारत निर्लेखनाचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नाशिक यांना प्राप्त होताच निर्लेखनाची कार्यवाही करुन नवीन इमारत बांधकामाची प्रशासकिय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**दोडी बु. (ता.सिन्नर, जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयात साहित्यअभावी बंद असलेल्या शव विच्छेदन कक्षाच्या साहित्याच्या मागणीबाबत**

**(३३) २६७६७ (१७-०८-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडी बु. (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील नाशिक-पुणे महामार्गावरील तसेच नाशिक-शिर्डी महामार्गालगत असलेल्या ग्रामीण रुग्णालय दोडी बु. येथील साहित्यअभावी बंद असलेल्या शव विच्छेदन कक्षासाठी साहित्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील शव विच्छेदन कक्षात विविध साहीत्य उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत व साहीत्य तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) असल्यास, किती कालावधीत शव विच्छेदन कक्ष सुरु होण्याची अपेक्षा आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) दोडी बु. ता. सिन्नर, जिल्हा नाशिक येथील शव विच्छेदन कक्षाचे हस्तांतरण सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिन्नर यांच्याकडून दिनांक २२.०६.२०१५ रोजी ग्रामीण रुग्णालय, दोडी बु. ता. सिन्नर, यांच्याकडे करण्यात आले आहे. सदर शव विच्छेदन कक्षासाठी आवश्यक असलेले साहित्य जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक यांच्याकडून दिनांक ०५.०८.२०१५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आले असून ग्रामीण रुग्णालय, दोडी बु. ता. सिन्नर येथील शव विच्छेदन कक्ष दिनांक ०६.०८.२०१५ पासून कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

---

**देगलूर (जि.नांदेड) जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाच्या प्रस्तावाबाबत**

**(३४) २७१७१ (१७-०८-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर तालुक्यातील (जि.नांदेड) उपजिल्हा रुग्णालय ५० खाटांचे १०० खाटात श्रेणी वाढ करण्याकरीता योग्य त्या निकषानुसार व योग्य त्या पूर्ततेसह प्रस्ताव सहसंचालक आरोग्य सेवा (रुग्णालये) राज्यस्तर, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर श्रेणी वाढ करण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(३) असल्यास, अद्यापी मंजूरी दिली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यास दि. १७.०१.२०१३ व दि. ०९.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे त्यानंतर प्राप्त झालेल्या आरोग्य संस्था स्थापनेच्या तसेच श्रेणीवर्धनाच्या प्रस्तावासंदर्भात एकत्रित धोरणात्मक निर्णयाची बाब विचाराधीन आहे. त्यावेळी देगलूर जि.नांदेड येथील दि. २२.०६.२०१५ रोजी शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

---

**नांदुरी (ता.कळवण, जि.नाशिक) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची**
**इमारत अद्यापही विनावापर पडून असल्याबाबत**

**(३५) २७२११ (१७-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरी (ता.कळवण, जि.नाशिक) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची नविन इमारत बांधण्यात आलेली असून सदरची इमारत अद्यापही विनावापर पडलेली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्र हे अद्यापही सुरु न होण्यामागील कारणे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे सदर इमारत वापरात नाही, हे देखील खरे आहे काय,

(४) असल्यास, या बाबीची शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०३-२०१६) :**(१) अंशत : खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०१५ पासून प्राथमिक आरोग्य केंद्र नांदुरी चे कामकाज नवीन इमारतीमध्ये सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ठ रुग्णालयांनी रुग्णांकडून पॅकेजपेक्षा जादा पैसे घेतल्याबाबत

**(३६) २८६७१ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट रुग्णालयांनी रुग्णांकडून पॅकेजपेक्षा जादा पैसे घेतल्याचे प्रकार कोल्हापुरसह विविध ठिकाणी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे जादा पैसे आकारले गेलेल्या कोल्हापुरातील ५३ रुग्णांना परतावा मिळवून देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा जादा पैसे आकारणाऱ्या रुग्णांलयाची शासनाने चौकशी केली आहे काय तसेच अशा रुग्णालयांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित रुग्णालयांची चौकशी करुन रुग्णांकडून अतिरिक्त घेतलेले पैसे परत करण्यात आले आहेत. तसेच टी.पी.ए. कंपनीमार्फत तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित रुग्णालयांना ताकीद, सुचना तसेच नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयातील खारेपाटण येथील कावीळचे रुग्ण आढळल्याबाबत

**(३७) २९४६६ (१६-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील खारेपाटण येथे कावीळचे रुग्ण आढळल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कावीळची साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाच्या आरोग्य विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०८-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) काविळीची साथ आटोक्यात आणण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या.

(१) दैनंदिन सर्वेक्षण

(२) रुग्णांवर उपचार

(३) पाणी गुणवत्ता सनियंत्रण

(४) खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांशी समन्वय

(५) आरोग्य शिक्षण

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कुष्ठरोग रुग्णालय बनविण्याबाबत**

**(३८) ३१४२६ (२१-०१-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोग रुग्णालय बनविण्याबाबत या विषयावरील दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी मा.आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत आणि याप्रकरणी कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०८-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वडणगेत व नागदेवाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे मलेरिया साथीचा मोठ्या प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(३९) ३१६७० (१६-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडणगेत व नागदेवाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे मलेरिया साथीचा मोठ्या प्रादुर्भाव झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मलेरियाच्या साथीला प्रतिबंध करणेबाबत शासनाने कोण्ती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) जिल्ह्यामध्ये करवीर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, वडणगे अंतर्गत मलेरियाचा (हिवताप) प्रादुर्भाव झाल्याने वडणगे येथे दिनांक २६.६.२०१५ रोजी व नागदेववाडी येथे दिनांक १०.९.२०१५ रोजी उद्रेक घोषित करण्यात आला होता. सदर उद्रेकामध्ये वडणगे अंतर्गत दि. १२.९.२०१५ पर्यंत १५३ व नागदेववाडी उद्रेकामध्ये १६ असे एकूण १६९ मलेरिया (हिवताप) रुग्ण आढळून आले आहेत.

उपरोक्त सर्व मलेरिया (हिवताप) रुग्णांना समूळ उपचार करण्यात आलेला आहे. उपचाराअंती सर्व रुग्ण बरे झाले असून एकाही रुग्णांचा मृत्यू झालेला नाही.

उद्रेकग्रस्त गावांमध्ये राबविण्यात आलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे :-

(१) जलद ताप सर्वेक्षण

(२) तापरुग्णांचे रक्तनमूना संकलन, तपासणी व सर्व रुग्णांना समूळ उपचार.

(३) किटकशास्त्रीय सर्वेक्षण

(४) कंटेनर सर्व्हे

(५) अळीनाशकाचा वापर

(६) धूरफवारणी

(७) किटकनाशक फवारणी इ.

(८) आरोग्य शिक्षण

(९) ग्रामसभा

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आल्याबाबत**

**(४०) ३४५६४ (२१-०१-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, दिनांक १६ ते ३१ ऑगस्ट, २०१५ दरम्यान राबविण्यात आलेल्या हत्तीरोग रूग्ण शोध मोहिम अहवालानुसार अंडवृध्दीचे २ हजार १५७ व हत्तीपायाचे ३ हजार ८४० असे एकूण ५,९९७ रुग्ण आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ मध्ये जिल्हयात विशेष शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरील शिबीरात कितीजणांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या तसेच सदरील हत्तीरोगाचा प्रादुर्भाव संपुष्टात आणण्याबाबत काय उपाययोजना केली आहे

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

दि.१६ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत अंडवृध्दीचे २०६५, हत्तीपायाचे ३८५० असे ५९१५ रुग्ण आढळून आले आहेत.

(३) होय.

जिल्हा रुग्णालय, नांदेड येथे दिनांक ८/०९/२०१५ ते १५/१०/२०१५ या कालावधीत अंडवृध्दी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

(४) सदर शिबीरात एकूण १६६ अंडवृध्दी रुग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून हत्तीरोग दुरीकरणासाठी शासन स्तरावर खालील उपाययोजना राबविण्यात आल्या व येत आहेत.

- हत्तीरोग रुग्ण सर्वेक्षणाकरीता नांदेड जिल्ह्यात हत्तीरोग सर्वेक्षण पथक, औरंगाबाद मार्फत व हत्तीरोग नियंत्रण पथकामार्फत लोकसंख्येतील १०% हत्तीरोग रुग्ण सर्वेक्षण करण्यात येते. तसेच रात्रचिकित्सालय पेठवडज व जलधारा अंतर्गत हत्तीरोग रुग्णांची तपासणी केली जाते.
- सर्वेक्षणात आढळून आलेल्या हत्तीरोग रक्तदुषित रुग्णांना १२ दिवसाचा डी.ई.सी. गोळ्यांचा संपूर्ण उपचार केला जातो.
- दर आठवड्याला नियंत्रण पथकामार्फत डासोत्पत्ती स्थानांवर क्षेत्र कर्मचाऱ्यांमार्फत अळीनाशकाची फवारणी करण्यात येते, तसेच डबकी बुजविणे, वाहती करणे, व्हेंट पाईपांना जाळ्या बसविणे या उपाययोजना केल्या जातात.
- जीवशास्त्रीय उपाययोजनेअंतर्गत गप्पीमासे पैदास केंद्राची निर्मिती करुन योग्य अशा डासोत्पत्ती स्थानांमध्ये अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात.
- किटक समांहारकांमार्फत किटकशास्त्रीय सर्वेक्षण नियमितपणे करण्यात येत आहे.
- हत्तीपाय रुग्णांच्या बाधित अवयवांची देखभाल व निगा राखणेसाठी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण प्रत्येक रुग्णाला दिले जाते.
- अंडवृध्दी रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यासाठी जिल्हा रुग्णालयात शिबीरांचे आयोजन केले जाते.
- सन २००४ पासून संपूर्ण जिल्ह्यामध्ये हत्तीरोग दुरीकरणासाठी एक दिवसीय सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबविण्यात येते.
- दरवर्षी दि. १६ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत हत्तीरोग रुग्ण शोध मोहिम राबविण्यात येते. हत्तीरोगाविषयी आरोग्य कर्मचारी व प्रसिध्दी माध्यमे यांचेमार्फत जनतेस आरोग्य शिक्षण देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माढा (जि.सोलापूर) येथील ग्रामीण रूग्णालयामध्ये स्वतंत्र नेत्रशल्य शस्त्रक्रिया विभागाच्या प्रस्ताव मंजूरीबाबत**

**(४१) ३५३८२ (२१-०१-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) ग्रामीण रूग्णालयासाठी स्वतंत्र नेत्र तपासणी विभाग, नेत्र शल्य शस्त्रक्रिया व आंतरूग्ण कक्ष बांधणेबाबतचा प्रस्ताव संचालक कार्यालय, मुंबई यांचेकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) या प्रस्तावाशी अन्य विभागाचा देखिल संबंध असल्याने प्रस्तावातील त्रुटी दूर करुन प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत संबंधित विभागास कळविण्यात आले आहे. त्यांचेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, तसेच जिल्ह्यातील ग्रामिण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये वर्ग १ व ४ ची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४२) ३६०९८ (२१-०१-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्ह्यातील ग्रामिण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी तसेच वर्ग ३ व ४ ची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्ह्यातील किती रुग्णालयातील एक्स-रे व सिटी स्कॅन मशीन बंद अवस्थेत आहेत,

(३) असल्यास, बहुतेक रुग्णालयांमध्ये एक्स-रे व सिटी स्कॅन चालविणारे ऑपरेटर उपलब्ध नसल्यामुळे ग्रामिण भागातील आदिवासी गरीब रुग्णांना खाजगी ठिकाणी जावे लागत असल्याचे माहे आक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रश्न गंभीर स्वरुपाचा असून भंडारासारख्या अतिदुर्गम नक्षलप्रभावीत जिल्ह्यात प्राधान्याने रिक्त पदे भरुन रुग्णालयातील मशीन्स तातडीने दुरुस्त करुन त्यासाठी ऑपरेटर नेमण्यासाठी शासन किती दिवसात कार्यवाही करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१७-०३-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांमध्ये गट-अ ची ११२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ७४ पदे भरलेली असून ३८ पदे रिक्त आहेत. गट-क ची ४९० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३७१ पदे भरलेली असून ११९ पदे रिक्त आहेत. तसेच गट-ड ची ३२० पदे मंजूर आहेत. त्यापैकी २०० पदे भरलेली असून १२० पदे रिक्त आहेत.

(२) जिल्हा रुग्णालय भंडारा, उपजिल्हा रुग्णालय, तुमसर व साकोली, ग्रामीण रुग्णालय, पवनी, लाखांदूर, लाखनी, मोहाडी, अड्याळ, या रुग्णालयात एक्स-रे मशीन असून फक्त ग्रामीण रुग्णालय लाखनी व मोहाडी येथील एक्स-रे मशीन बंद आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय, सिहोरा व पालांदूर येथे क्ष-किरणयंत्र उपलब्ध नाही.जिल्हा रुग्णालय, भंडारा येथेच सिटीस्कॅन मशीन असून ते दि. १७.१०.२०११ पासून बंद आहे.

(३) ग्रामीण रुग्णालय, लाखांदूर, लाखानी, सिहोरा व पालांदूर येथे क्ष-किरणतज्ञांची पदे मंजूर आहेत मात्र ती रिक्त आहेत. उर्वरित रुगालयामध्ये ती भरलेली आहेत. सीटी स्कॅन खाजगी संस्थांकडून करण्यात येत असून त्यावरील खर्च राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना आणि असंसर्गजन्य (एनसीडी) रोगांसाठीच्या योजनेतून करण्यात येतो.

(४) गट-अ व गट-ब रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड ची पदे विभागीय स्तरावर भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**टाकळघाट (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील अंगणवाडयांची झालेली दुरवस्था**

**(४३) ३६१७२ (१२-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळघाट (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील अंगणवाडयाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाकळघाट येथे एकूण ११ अंगणवाडया असुन ९ अंगणवाडयाची स्वतंत्र शासकीय इमारत आहे मात्र अंगणवाडी क्र. १९४ येथील इमारतींचे मोडकळीस आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) तसेच महिला बालकल्याण शेष फंड १० टक्के व समाजकल्याण विभागातर्फे १५ टक्के खर्च ग्रामपंचायतला अंगणवाडयावर करावा लागतो परंतु ग्रामपंचायत प्रशासनाच्या दिरंगाईमुळे बालकांच्या सर्वगिण विकास व मुलभुत शासन व प्रशासन दुर्लक्ष करीत आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणावर चौकशी करून कारवाई केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, टाकळघाट येथे एकूण ११ अंगणवाड्या आहेत. त्यापैकी ९ अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीत भरतात. स्वतंत्र इमारतीपैकी १९४ क्रमांकाची अंगणवाडीच्या इमारतील

भेगा पडल्यामुळे व फ्लोरिंग दबल्यामुळे दुरुस्तीची आवश्यकता आहे. त्यासाठी दिनांक १४/८/२०१५ रोजीच्या ग्रामपंचायतच्या सभेत ठराव घेण्यात आला असून त्याचे प्राकलन तयार करण्याकरीता पंचायत समिती हिंगणा यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. प्राकलन प्राप्त होताच ग्रामपंचायतीच्या १० % सामान्य निधीतुन दुरुस्ती करण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

ग्रामपंचायत टाकळघाट यांनी सामान्य निधी अंतर्गत महिला व बाल कल्याण १० % निधीतून खालीलप्रमाणे कार्यवाही केले आहे.

| वर्ष | केलेली कामे | खर्च |
|---|---|---|
| २०१२-१३ | अंगणवाडी भाड्यासाठी | ९४,५००/- |
| २०१३-१४ | अंगणवाडी भाडे व अंगणवाडी रंगरंगोटी | ३,७७,७८४/- |
| २०१४-१५ | अंगणवाडी भाडे | ८६,६२५/- |

समाज कल्याण निधीचा १५% निधी अंगणवाडीवर खर्च करण्यात यावा असे कोणतेही बंधन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेने प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसायिकांना कर्ज देण्यास मनाई केल्याबाबत

**(४४) ३६५०० (१४-०१-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा घनसावंगी तालुक्यातील मौजे कुंभारी पिंपळगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेने प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसायिकांना कर्ज देण्यास मनाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१६) :**(१) नाही.

मौजे कुंभारी पिंपळगाव, ता.घनसावंगी, जि.जालना येथे स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेची कुठलीही शाखा नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजुरा तालुक्यातील (जि.चंद्रपूर) येथील देवाडा, लक्कडकोट, येरगव्हान व राजुरा शहरातील सोमनाथपूर, सोनिया नगर, रमाबाई नगर येथे जवळपास २५० मलेरिया सदृष्य रुग्ण आढळून आल्याबाबत**

**(४५) ३६६६० (२१-०१-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा तालुक्यातील (जि.चंद्रपूर) येथील देवाडा, लक्कडकोट, येरगव्हान व राजुरा शहरातील सोमनाथपूर, सोनिया नगर, रमाबाई नगर येथे जवळपास २५० मलेरिया सदृष्य रुग्ण आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णाच्या आरोग्याच्या दृष्टीने संबंधीत विभागाकडून कोणत्याही उपायोजना न केल्याचे अनेक तक्रारीही जिल्हा परिषदेला प्राप्त झाल्या आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णंच्या आरोग्याच्या दृष्टीने व आगामी प्रतिबंध म्हणून शासनानी कोणत्या उपाययोजना केल्या वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे व उपाययोजना काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

परंतू, उपरोक्त गावामध्ये (देवाडा, लक्कडकोट, येरगव्हान) व राजुरा शहर अंतर्गत (सोमनाथपूर, सोनियानगर, रमाबाईनगर) या वार्डामध्ये सन २०१५ मध्ये ४३६९ तापाच्या रक्तनमूने हिवतापाकरीता तपासण्यात आले. त्यापैकी एकूण ३४ रक्त नमुने हिवताप दुषित आढळले.

(२) हे खरे नाही.

(३) या बाबत शासन नियमितपणे करीत असलेल्या प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना खालीलप्रमाणे :-

(१) नियमित व जलद ताप सर्व्हेक्षण करणे.
(२) रक्त नमुना घेऊन हिवताप बाधित रुग्णांना समूळ उपचार करणे.
(३) कंटेनर सर्व्हेक्षण करणे व दुषित कंटेनर रिकामे करणे, रिकामे करता न येणाऱ्या कंटेनरमध्ये ॲबेट टाकणे.
(४) डासअळीनाशक फवारणी करणे.
(५) धुर फवारणी करणे.
(६) किटकनाशक फवारणी करणे.
(७) गप्पी मासे सोडणे.
(८) नाल्या व गटारे वाहते करणे.
(९) आरोग्य शिक्षण.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**मौजा शिंदी (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथे साथीच्या आजाराने गावातील सुमारे ७५ ग्रामस्थांना तापाची लागण झाल्याबाबत**

**(४६) ३६६७६ (२१-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा शिंदी (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथे माहे सप्टेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात साथीच्या आजाराने गावातील सुमारे ७५ ग्रामस्थांना तापाची लागण झाल्याचे निर्दर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू साथीचा आजार गावात पसरल्याची सर्वसाधारण कारणे काय याबाबत साथ रोग आटोक्यात आणण्यासाठी शासनाने कोणती उपययोजना केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

परंतु सदर गावात माहे सप्टेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात कोणत्याही प्रकारची साथ उद्‌भवलेली नसून किरकोळ सर्दी, तापाचे एकूण ७ रुग्ण आढळून आलेले होते.

(२) सदर ठिकाणी साथ नसली तरीही साथरोग उद्‌भवू नये म्हणून शासनामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना नियमितपणे राबविण्यात आल्या व येत आहेत.

- ताप रुग्ण सर्वेक्षण.
- ताप रुग्णांचे रक्तनमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी,
- तपासणी अंती आढळून आलेल्या हिवताप रुग्णांना जंतूच्या प्रकारानुसार समूळ उपचार.
- गप्पीमासे पैदास केंद्र कार्यरत असून तालुक्यातील डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पती मासे सोडणे.
- किटकशास्त्रीय सर्वेक्षण अंतर्गत पाणी साठ्यांची तपासणी, डास अळ्या आढळून आलेले पाणीसाठे रिकामे, करणे व रिकामे करता न येणाऱ्या पाणी साठ्यामध्ये टेमिफॉस ५० टक्के इ. सी अळीनाशकाचा योग्य त्या प्रमाणात वापर.
- किटकनाशकाची धुरफवारणी.
- शासकीय आरोग्य संस्थांना आवश्यक तो औषधांचा पुरवठा तसेच जिल्हयाला किटकनाशके, अळीनाशके व साहित्यसामुग्री पुरवठा.
  किटकजन्य आजाराच्या उपचाराकरीता पुरेसा औषधसाठी स्थानिक आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध आहे.
- उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा / विभागीय अधिकाऱ्यांच्या भेटी.
- विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजीव गांधी जीवनदायी योजनेमधून छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालय, कोल्हापूर येथे उपचार होत नसल्याबाबत

**(४७) ३६७४२ (१६-०१-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये देण्यात आलेल्या एकूण वैद्यकिय आजारांपैकी १३१ आजार हे शासकीय रुग्णालयामध्ये उपचार घेता येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती प्रमिलाराजे शासकिय रुग्णालय, कोल्हापूर या ठिकाणी राजीव गांधी आरोग्यदायी योजनेमधून कोणतेही उपचार होत नसल्याने हजारो रुग्णांना शासनाच्या महत्वपूर्ण योजनेचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ जाणीवपूर्वक सर्वसामान्य नागरीकांना न देण्याऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :**(१) होय. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट ९७१ उपचारपध्दतीपैकी १३१ उपचार पध्दती या शासकीय रुग्णालयांसाठी राखीव आहेत.

(२) नाही. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य आरोग्यअंतर्ग छत्रपती प्रमिलराजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे अंगीकृत असुन दि.२१.११.२०१३ ते आतापर्यंत दि.३१.०१.२०१६ पर्यंत एकुण ६७२ उपचार/शस्त्रक्रिया करण्यात आल्या असुन त्यासाठी रु.२.३१ कोटी एवढी रक्कम मंजुर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी व सार्वजनिक रुग्णालयातील राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत उपचार घेणाऱ्या सुमारे ६३ टक्के रुग्णांना सेवेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(४८) ३९२३२ (२९-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी व सार्वजनिक रुग्णालयांत राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत उपचार येणाऱ्या सुमारे ६३ टक्के रुग्णांना या योजनेचा लाभ घेताना वैद्यकीय निदान, औषधोपचार आहार आणि औषधोपचारासाठी स्वत:च्या खिशातून पैसे खर्च करावे लागत असल्याची गंभीर बाब माहे नोव्हेंबर, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाकडून आजतागायता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

योजनेंतर्गत आतापर्यंत ७,४९,०००/- शस्त्रक्रीया/ उपचार झाले असून त्यापैकी ४९८३ रुग्णांनी वैद्यकीय निदान, औषधोपचार आहार आणि औषधोपचारांसाठी स्वत:च्या खिशातून पैसे खर्च करावे लागल्याच्या तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. त्याचे प्रमाण आतापर्यंत झालेल्या एकूण शस्त्रक्रियांच्या ०.६६ टक्के एवढे आहे.

(२) होय.

(३) योजना सुरु झाल्यापासुन आतापर्यंत विविध प्रकारच्या ७३८२ तक्रारी नोंदविण्यात आल्या असुन त्यापैकी ५७६९ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. त्याचे प्रमाण ७८ टक्के एवढ आहे.

तसेच प्राप्त तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत ३ रुग्णालयांचे निलंबन करण्यात आले असुन १०३ रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वाईन फ्लूवर मोफत उपचार देण्याच्या शासनाच्या निर्णयाबाबत

**(४९) ३९४३६ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी, २०१५ पासून स्वाईन फ्लूची साथ पसरुन त्यात शेकडो लोकांचा मृत्यू झाल्यामुळे स्वाईन फ्लूवर मोफत उपचार देण्याचा निर्णय शासनाने घोषित करुनही, आर्थिक दूर्बल घटकातील जे रुग्ण २ मार्च, २०१५ पासून खाजगी रुग्णालयामध्ये व्हेंटिलेटरवर होते अशाच रुग्णांना त्यची भरपाई मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी ते १ मार्च या कालावधीत खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन घरी परतलेल्या अथवा व्हेंटिलेटरवर असलेल्या रुग्णांना मदत करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे मार्च, २०१५ पर्यत राज्यात १४३ व्यक्ती स्वाईन फ्लूने मृत्यूमुखी पडल्यानंतर १ मार्च, २०१५ पर्यंत ४१ रुग्ण व्हेंटिलेटरवर होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सीजीएचएस च्या वेबसाईटवर रेस्पिरेटरचे एका दिवसाचे दर सुमारे १३०० ते १४०० होते, तर खाजगी रुग्णालयात एका दिवसाचे व्हेंटिलेटरचे भाडे ५ ते १० हजार असून, सीजीएचएस च्या दराप्रमाणे भरपाई दिल्याने रुग्णांना केवळ ३० ते ४० टक्केच बीलाची रक्कम मिळाली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाच्या निर्णयानुसार सर्व रुग्णांना उपचारचे सर्व पैसे देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०८-०३-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रतिपूर्ती ही शासन निर्णयानुसार सी.जी.एच.एस.च्या दराप्रमाणे देय राहील.
(५) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

मात्र दिनांक २०/०३/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी मुख्यमंत्री सहाय्यक निधीतून रुपये ३ कोटी इतका निधी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुसार ३० देयके पारीत करण्यात आली आहेत.

---

**ठाणे व पालघर जिल्हयात २७ हजार एचआयव्ही बाधीत रुग्ण आढळून आल्याबाबत**

**(५०) ३९६१८ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्हयात २७ हजार एचआयव्ही बाधीत रुग्ण आढळून आल्याचे आयईसीचे सहसंचालकांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी एड्स नियंत्रण सोसायटीच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी माहिती दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास त्याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास एड्स नियंत्रणासाठी शासनाने कोणकोणती उपाययोजना केली आहे व त्याची फलनिष्पती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०८-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

परंतु सदर आकडेवारी ही एका वर्षातील नसुन ठाणे जिल्हयातील (सध्याच्या ठाणे व पालघर जिल्हा) एचआयव्ही / एड्स नियंत्रण कार्यक्रम राबविणे सुरु झाल्यापासून (सन २००७ ते ऑगस्ट २०१५) या कालावधीत एचआयव्ही संसर्ग झालेल्या रुग्णांची एकत्रित सर्वसाधारण संख्या आहे.

(२) एचआयव्ही संसर्ग होण्याची प्रमुख ४ कारणे आहेत.

- असुरक्षित लैंगिक संबंध.
- नवजात बालकास मातेकडून होणारा एचआयव्ही संसर्ग.
- रक्त संक्रमण व शिरेवाटे नशा करण्यामुळे होणारा एचआयव्ही संसर्ग.
- ठाणे जिल्हा हा लोकसंख्येकच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा असून या जिल्हयातील औद्योगिकरणामुळे या जिल्हयात स्थालांतरीत कामगारांची संख्या फार मोठी आहे. त्याचबरोबर देह विक्री करणाऱ्या स्त्रिया, शिरेवाटे नशा करणारे युवक समलैंगिक संबंध ठेवणारे पुरुष, तृतीयपंथी व ट्रकर्स इत्यादी अतिजोखीम गटातील व्यक्तींची संख्या देखील जास्त आहे.त्यामुळे ठाणे जिल्हयातील एकूण एचआयव्ही संसर्ग झालेल्या व्यक्तिंची संख्या जास्त दिसून येते.

(३) शासन स्तरावर एचआयव्ही/ एड्स कार्यक्रमांतर्गत एचआयव्ही महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेद्वारे प्रत्येक जिल्हा पातळीवर जिल्हा एड्य प्रतिबंध व नियंत्रण पथे यांच्याअंतर्गत आयसीटीसी, एआरटी, एसटीआय केंद्र व रक्तपेढ्या तसेच अशासकीय संस्था यांच्यामार्फत सर्वसामान्य जनता, गर्भवती महिला व पौगंडावस्था असलेल्या तरुणांना एचआयव्ही संसर्ग होऊ नये यासाठी जनजागृती केली जाते. तसेच एचआयव्ही रक्तचाचणी, एआरटी उपचार व निरोध पुरवठा इ. सुविधा मोफत पुरविण्यात येतात.

उक्त उपाययोजनांमुळे ठाणे (सध्याच ठाणे व पालघर जिल्हा) जिल्ह्यातील नव्याने एचआयव्ही संसर्ग होण्याचे प्रमाणे ३.७९ टक्क्यांवरुन ०.७६ टक्क्यांपर्यंत कमी झालेले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.